# ट्रू क्रेडिट्स प्रायव्हेट लिमिटेड

# कर्ज अर्ज - अटी आणि नियम

**दस्तऐवज क्रमांक: TC-LATC**

# दस्तऐवज तपशील

| विवरण | तपशील |
|---|---|
| **शीर्षक** | **कर्ज अर्ज - अटी आणि नियम** |
| **आवृत्ती** | 4.0 |
| **वर्गीकरण** | सार्वजनिक |
| **वर्णन** | **कर्ज अर्ज - अटी आणि नियम** |
| **प्रभावी तारीख** | **एप्रिल 01, 2023** |

हा कर्ज अर्ज – अटी आणि शर्ती ("अटी आणि शर्ती"), भारतीय कायद्याच्या अनुपालनामध्ये प्रकाशित करण्यात आला आहे आणि तो, (i) भारतीय करार कायदा, 1872; (ii) माहिती तंत्रज्ञान (वाजवी सुरक्षा पद्धती आणि प्रक्रिया आणि संवेदनशील वैयक्तिक माहिती) नियम, 2011, आणि माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे) नियम, 2011 चा नियम 3 (1)च्या तरतुदींसह त्याअंतर्गत तयार केलेले नियम, विनियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि स्पष्टीकरणे यासह माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 आणि (iii) भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, 1934 आणि त्याखाली बनवलेले लागू नियम, नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे, या पण त्यापुरत्या मर्यादित नसलेल्या कायद्यांद्वारे नियंत्रित केला जाईल.

या अटी व शर्ती म्हणजे, माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम आणि माहिती तंत्रज्ञान कायदा, 2000 द्वारे सुधारित केलेल्या विविध कायद्यांमधील इलेक्ट्रॉनिक दस्तऐवज / रेकॉर्डशी संबंधित सुधारित तरतुदींच्या अंतर्गत तयार केलेल्या इलेक्ट्रॉनिक कराराच्या स्वरूपात एक इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड आहे. या अटी व शर्ती दस्तऐवजावर कोणत्याही भौतिक, इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल स्वाक्षरीची आवश्यकता नाही.

या अटी आणि शर्ती, तुमच्या आणि टू क्रेडिट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि / किंवा तिचे कर्जदाते भागीदार यांच्या दरम्यानचे कायदेशीर बंधनकारक दस्तऐवज आहे (खाली अटी परिभाषित केलेल्या आहेत). हा दस्तऐवज तुम्ही त्या अटी स्वीकारल्यानंतर प्रभावी होईल (इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डद्वारे किंवा इतर माध्यमांद्वारे).

1. या अटी आणि शर्तींच्या उद्देशासाठी, जेथे संदर्भास तशी आवश्यता असेल तेथे,
    a. "तुम्ही/तुमचे", "ग्राहक" किंवा "वापरकर्ता" म्हणजे अशी कोणतीही नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती असेल, जिला टू क्रेडिट्स आणि / किंवा तिच्या कर्जदात्या भागीदारांकडून कर्ज घेण्याची इच्छा आहे.
    b. "True Balance" किंवा "प्लॅटफॉर्म" याचा अर्थ, बॅलन्सहेरो इंडिया प्रायव्हेट लिमिटेडद्वारे संचालित डिजिटल लेंडिंग ॲप्लिकेशन (DLA) असा असेल.
    c. "टू क्रेडिट्स" चा अर्थ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) कडे नोंदणीकृत असलेली एक NBFC, टू क्रेडिट्स प्रायव्हेट लिमिटेड असा असेल.
    d. "कर्जदात्या" चा अर्थ, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, टू क्रेडिट्स किंवा तिचे कर्जदाते भागीदार असा असेल.
    e. "कर्जदाता भागीदारा" चा अर्थ, ज्यांच्यासोबत प्लॅटफॉर्मद्वारे कर्ज किंवा संबंधित वित्तीय सेवा सुलभ करण्यासाठी टू क्रेडिट्सशी व्यवस्था करण्यात आली आहे, अशा बँका, नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्या आणि भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे नियमन केल्या जाणाऱ्या इतर वित्तीय संस्था असेल.
    f. "कर्जा" चा अर्थ, ग्राहकाशी सहमत असलेल्या अटी व शर्तींनुसार, टू क्रेडिट्स आणि / किंवा तिच्या कर्ज देणाऱ्या भागीदारांद्वारे ग्राहकाला दिलेली विविध कर्ज उत्पादने / सेवा, असा असेल.
    g. "कर्ज दस्तऐवज" चा अर्थ कर्जाच्या संबंधात कार्यान्वित केले जाऊ शकणारे कोणतेही इतर दस्तऐवज, आणि त्यात समाविष्ट असलेले विधान, मंजुरी पत्र, कर्ज करार / कर्ज वितरण पत्र (सामान्य अटी आणि शर्तींसह) असा असेल.

2. तुम्हाला या बाबीची जाण आहे आणि तुम्ही याद्वारे तिच्याशी सहमत आहात आणि तिला कबूल करता की, True Balance हे एक डिजिटल लेंडिंग ॲप्लिकेशन आहे आणि कर्ज मंजूर झाल्यास, ते कर्जदात्याकडून प्रदान केले जाईल. पुढे, जसे की कर्जाच्या कागदपत्रांमध्ये विशेषतः नमूद केले आहे, तुम्ही याद्वारे कर्जदात्याला लागू प्रक्रिया शुल्क आणि इतर फी, शुल्क, कर इत्यादी कर्जातून वजा करण्यासाठी अधिकृत करता.

3. या अटी आणि शर्ती आणि कर्ज दस्तऐवज आणि गोपनीयता धोरण इत्यादींमध्ये समाविष्ट असलेल्या इतर सर्व लागू अटी आणि शर्ती किंवा अन्यथा, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, त्या कर्जदात्याने जारी केल्या असल्यास, त्या, कर्जदात्याकडून घेतलेल्या कर्जासाठी, ग्राहक/कर्जदार म्हणून तुमचे अधिकार आणि दायित्वे नियंत्रित करतील.

4. True Balanceवर सुविधा पुरविण्यात आलेल्या कर्जाची तुमच्याद्वारे प्राप्ती आणि त्या कर्जात तुमच्यासाठी प्रवेश या बाबी, तुम्ही या अटी आणि शर्तींना स्वीकारण्यावर आणि त्यांचे सतत पालन करण्याच्या अधीन आहे.

5. तुम्हाला या बाबीची जाण आहे आणि तिला कबूल करता की, हे कर्ज फक्त अशा भारतीय नागरिकांद्वारेच प्राप्त केले जाऊ शकते जे भारतीय करार कायदा, 1872 अंतर्गत कायदेशीर बंधनकारक करार करण्यास सक्षम आहेत. भारतीय करार कायदा, 1872 च्या तरतुदींनुसार, अल्पवयीन, डिस्चार्ज न करण्यात आलेले दिवाळखोर, इत्यादींसह करार करण्यास अक्षम समजली जाणारी कोणतीही व्यक्ती, हे कर्ज घेण्यास पात्र नाही.

6. तुम्ही या बाबीशी सहमत आहात की, तुम्ही आमच्याशी नोंदणी केल्यानंतर आणि कर्ज घेताना आणि इतर सर्व वेळी, जी तुमची माहिती जसे की नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, बँक खाते माहिती, आर्थिक/व्यवहार तपशील इ. ("वापरकर्ता माहिती") प्रदान करता, ती खरी, अचूक, सद्यकालीन आणि पूर्ण असेल. तुम्ही या वापरकर्ता माहितीची देखभाल करण्यास आणि तिला अद्ययावत ठेवण्यास आणि वापरकर्ता माहिती सत्य, अचूक आणि पूर्ण ठेवण्यास सहमती देता.

7. तुम्ही याद्वारे या बाबीशी सहमत आहात आणि तिला कबूल करता की, कर्जाच्या अर्जाच्या मूल्यांकनासाठी आणि इतर संबंधित उद्देशांसाठी, कर्ज अर्ज करताना True Balanceसह शेअर केलेली तुमची वैयक्तिक माहिती कर्जदाराशी शेअर केली जाईल.

8. तुम्ही याद्वारे अधिकृत करता की, जर तुम्ही वॉलेटद्वारे परतफेड करण्याचा पर्याय निवडला तर, कर्जाचे लागू होणारा/होणारे हप्ता/हप्ते तुमच्या True Balance वॉलेट खात्यातून तसेच ट्रू क्रेडिट्सद्वारे प्रदान केलेल्या पेमेंट शेड्यूलनुसार डेबिट केले जाऊ शकतात.

9. तुम्ही याद्वारे ट्रू क्रेडिट्सद्वारे प्रदान केलेल्या विविध कर्ज ऑफर किंवा प्रचारात्मक योजना किंवा True Balance वेळोवेळी फोन कॉल, SMS, व्हॉट्सॲप, इलेक्ट्रॉनिक मेल्सद्वारे किंवा इतर कोणत्याही संवादा (कम्युनिकेशन) द्वारे प्राप्त करण्यास संमती देता. तुम्ही पुढे संमती देता की, तुमच्या कर्जाची/कर्ज प्रक्रीयेची स्थिती, खाते उपक्रम, कर्ज/कर्जाच्या प्रक्रियेबाबत स्मरणपत्र किंवा अभिप्राय पाठवण्याच्या किंवा चर्चा करण्याच्या उद्देशाने एकतर फोन कॉल्स, SMS, व्हॉट्सॲप, इलेक्ट्रॉनिक मेल्सद्वारे किंवा उपलब्ध असलेल्या संप्रेषणाच्या इतर कोणत्याही पद्धतीद्वारे, ट्रू क्रेडिट्स किंवा True Balance आणि/किंवा त्याचे अधिकृत प्रतिनिधी/सेवा प्रदाता तुमच्याशी संवाद साधू शकतात आणि असे फोन कॉल, SMS इ. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण (TRAI) च्या "व्यत्यय आणू नका" धोरणाच्या कक्षेत येणार नाहीत. या उद्देशासाठी, तुम्ही याद्वारे ट्रू क्रेडिट्स किंवा True Balance आणि/किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी/सेवा प्रदात्यांना सोमवार ते रविवार 0900 ते 2100 तासांच्या दरम्यान कधीही तुमच्याशी संपर्क साधण्याची परवानगी देता.

10. कर्ज मिळविण्यासाठी, KYC मानदंडांची पूर्तता करणे आणि कर्जदात्याकडे आवश्यक माहिती सादर करणे अनिवार्य आहे. जर तुम्ही तुमचे KYC True Balance कडे सादर केले असेल, तर तुम्ही याद्वारे सहमत आहात आणि कबूल करता की, कर्ज आणि संबंधित सेवांचा लाभ घेण्यासाठी तुमचे KYC कर्जदारासोबत शेअर केले जाऊ शकते.

11. तुम्ही याद्वारे तुमचे क्रेडिट ब्युरो रेकॉर्ड पाहण्यासाठी कर्जदात्याला तुमची स्पष्ट संमती देता आणि कर्जदात्याकडे केलेल्या कर्ज अर्जाच्या संबंधात तुमच्या क्रेडिट योग्यतेचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने त्याचा वापर करता आणि आवश्यकतेनुसार क्रेडिट ब्युरोला आवश्यक अहवाल देता. तुम्ही वेळोवेळी तुमच्या क्रेडिट योग्यतेचे मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्या (CIC) कडून त्यानंतरचे अतिरिक्त अहवाल आणण्यासाठी / काढण्यासाठी कर्जदात्याला सहमती देता आणि अधिकृत करता.

12. तुम्हाला जाण आहे आणि तुम्ही कबूल करता की, कर्जासाठी तुमचा अर्ज, ही कर्ज मंजूरीची किंवा वितरणाची हमी नाही आणि ते फक्त कर्जदात्याच्या पूर्ण विवेकबुद्धीनुसार असेल.

13. वेळोवेळी कर्ज देण्यासाठी आणि संबंधित सेवांसाठी, तुम्ही कर्जदात्याला तुमची सर्व किंवा कोणतीही माहिती कोणत्याही वैधानिक / नियामक अधिकाऱ्यांसह, जसे योग्य असेल त्याप्रमाणे आणि / किंवा त्यांच्या अधिकृत सेवा प्रदात्यांसोबत शेअर करण्यासाठी अधिकृत करता.

14. तुम्ही याद्वारे समजता आणि कबूल करता की कर्जाच्या प्रक्रियेत, तुम्हाला बँक खाते स्टेटमेंट आणणाऱ्या भागीदाराकडे पुनर्निर्देशित केले जाऊ शकते, आणि तुमचे खाते स्टेटमेंट फक्त तुमच्या कर्ज अर्जाचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जाईल.

15. तुम्ही e-NACH /कलेक्शन खात्यासाठी कर्जदाराच्या बाजूने दिलेला अन्य आदेश, प्रदान करण्यास सहमत आहात. कर्जाची थकबाकी असताना तुम्ही तुमचे बँक खाते बंद करू शकत नाही किंवा कर्जदात्याला 30 दिवसांची पूर्व सूचना न देता, e-NACH /इतर आदेश काढून घेऊ शकत नाही आणि असे बँक खाते बंद झाल्यास, तुम्ही कर्जदाराने निर्देशित केल्यानुसार योग्यरित्या e-NACH /इतर आदेश या साठी पर्याय पुरवाल. कृपया लक्षात घ्या की, e-NACH आदेशाला अशा प्रकारे अनधिकृतपणे काढून घेतल्यास, ते पेमेंट आणि समझोता कायदा 2007च्या कलम 25 चे उल्लंघन आहे आणि ते, कायदेशीर कारवाईसाठी जबाबदार आहे.

16. तुम्ही सहमत आहात, प्रतिनिधित्व करता आणि हमी देता की, कर्ज सेवांचा तुमच्याद्वारे वापर हा, कोणत्याही लागू कायद्याचे किंवा नियमांचे उल्लंघन करणार नाही. तुम्हाला याद्वारे जाण आहे की, तुमचा कर्ज सेवांचा वापर केवळ कायदेशीर हेतूंसाठी असेल आणि त्यात, कर्जदात्यांना हानीकारक असलेल्या कोणत्याही उपक्रमाची कल्पना केली गेलेली नसेल. तुम्हाला जाण आहे की, तुम्हाला कर्ज दस्तऐवजांमधून कोणतीही सामग्री हटवण्यास किंवा सुधारित करण्यास; कर्जाविरुद्ध किंवा कर्जदात्याविरुद्ध कोणतीही खोटी किंवा दुर्भावनापूर्ण विधाने करणे; आणि स्पॅमिंग आणि फिशिंगसह कोणत्याही असामाजिक, विघटनकारी किंवा विध्वंसक कृत्यांमध्ये सामील होण्यास स्पष्टपणे प्रतिबंध आहे. या सेवेंच्या वापरामुळे किंवा गैरवापरामुळे उद्भवलेल्या कोणत्याही दाव्या, नुकसान, विवादांसाठी कर्जादाता जबाबदार किंवा/आणि उत्तरदायी असणार नाही.

17. कोणत्याही वेळी कर्जदात्याला उचित आणि योग्य वाटेल तेव्हा आणि आगाऊ सूचना देण्याच्या कोणत्याही बंधनाशिवाय, या अटी आणि शर्तींमध्ये कोणतेही बदल आणि सुधारणा करण्याचा पूर्ण अधिकार कर्जदात्याने राखून ठेवला आहे. या अटी व शर्तींच्या अद्ययावत आवृत्तीसाठी तुम्ही आमच्या वेबसाइटला / ॲपला भेट देऊ शकता. तुमचे कर्ज सुरू राहणे म्हणजे, असे कोणतेही बदल आणि अद्ययावत अटी व शर्तींना बांधील असणारा करार स्वीकारणे होय.

18. लागू कायद्यानुसार, कर्जदात्याद्वारे प्रदान केल्या जाणाऱ्या कर्जासंदर्भात कोणतीही चिंता किंवा तक्रार असल्यास, तुम्ही https://www.truecredits.in/partner येथे कर्जदात्याच्या संबंधित तक्रार अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकता.

19. या अटी आणि शर्तींमधून उद्भवणारा कोणताही विवाद किंवा तुमचा आणि कर्जदाराचा समावेश असलेला कोणताही विवाद, भारताच्या कायद्यांनुसार नियंत्रित केला जाईल आणि त्याचा अर्थ लावला जाईल. तुम्ही सहमत आहात की, वर उल्लेख केलेल्या बाबीच्या संदर्भात कोणतीही कायदेशीर कार्यवाही केवळ गुरुग्राम, हरियाणा, भारतातील अधिकार क्षेत्र असलेल्या सक्षम न्यायालयांमध्ये दाखल केली जाऊ शकते.